कोई भी कार्य करने से पहले अपने मकसद की जांच कर लें। यदि स्वार्थ है तो उस कर्म को त्याग दो। उद्देश्यों को शुद्ध करने में कुछ समय लगता है। निरंतर कर्म करते रहो और अपने उद्देश्यों पर नजर रखो। धीरे-धीरे उद्देश्य अधिकाधिक पवित्र होते जायेंगे।

स्वामी शिवानंद

आपको भगवान की पूरी कृपा और संतों का आशीर्वाद मिल सकता है, लेकिन जब तक आप ईमानदारी से साधना करने का मन नहीं बनाते, तब तक दैवीय कृपा का कोई फायदा नहीं होगा।

स्वामी चिदानन्द



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत-

- ❊ नोव्हेंबर २०२४ चा सत्संग २४ तारखेला झाला.
- ❊ 'दिव्य जीवन' या आपल्या मासिक पत्रिकेचा नोव्हेंबर महिन्याचा अंक परिवारातील सदस्यांना (हार्ड आणि सॉफ्ट स्वरूपात) पाठविण्यात आला.

### पुणे शाखेचा पत्ता


श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य' प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के. विश्व, धायरी, पुणे ४११०६८,
मो.नं. ९८५०९३१४१७

बुक पोस्ट


प्रति,



# दिव्य जीवन



पुणे शाखा
वर्ष १९ / अंक १२
डिसेंबर २०२४



All life is Yoga. Life is to be lived as the great sadhana, the great Yoga. All actions constitute Yoga. Everything that you think is Yoga. Everything that you speak is Yoga. Everything that you do is Yoga.

There is nothing else in life except Yoga and Yoga alone. All of life is yoga. Life is the great sadhana. Life is the supreme Yoga, every part of it. Life is to be lived as such.

Each and every one of our actions from morning till evening should have a Godward thrust; they are to be engaged in for attaining illumination. Everything in our life is and ought to be enlightenment oriented. — Breathing, sitting, standing, running, resting, working, lying, waking, dreaming, sleeping, all constitute that one single process — Yoga.

**Sri Swami Chidananda**

**<u>महिन्याचा विचार</u> :**

''कोणाच्याही भावना दुखावू नये. सर्वांभूती सहानभूती, कणव बाळगा.'' ही गुरूदेवांची स्पष्ट शिकवण आहे आणि ती त्यांच्याइतकी परिपूर्णपणे कोणीच अंमलात आणलेली नाही. त्यांना सात्विक संतापही येत नसे. इतर गुरू जर दंडुक्याचा वापर करा असा सल्ला देत असतील तर गुरूदेव सेवा, प्रेम, ध्यान अशा आयुधांचा वापर करीत. ज्या व्यक्तीमध्ये सुधारणा घडवून आणायच्या असतील तर त्याची सेवा करा, त्याच्यावर प्रेम करा आणि त्याच्यासाठी प्रार्थना करा. हाच अहिंसेचा मार्ग आहे. गुरूदेवांसाठी अहिंसा हा वैश्विक प्रेमाचा सकारात्मक आविष्कार आहे. शब्द, विचार आणि कृतीत प्रेम असावे ही त्यांची शिकवण होती. प्रत्येक दिवशी, प्रत्येक मिनिटात आणि प्रत्येक श्वासात प्रेम असावे असे त्यांना वाटे. ते स्वत: अहिंसेत स्थित होते. क्षणभरासाठी ही इतरांना दुखावणे त्यांना पसंत नव्हते. मग इतरांचे दु:ख दूर करण्यासाठी धावपळ करणे अलाहिदा. गंगेत स्नान करताना गुरूदेवांच्या आसपास एखादा कीटक अजाणताही आला तर ते थबकून अशा कीटकाला तळहातावर घेऊन किनाऱ्यावर आणून ठेवत.

चेहेऱ्यावर तिटकारा न आणता ते आम्हांस सांगत–''एखादा कीटक अगदी विष्ठेतही जीवन वाचविण्यासाठी संघर्ष करीत असेल तर मी तेही दूर करून त्या कीटकाचे प्राण वाचवीन.'' इतकेच नव्हे तर कोणीही कोणाला इजा पोहोचवत असेल तर गुरूदेव त्यांना थांबवीत. मी माझ्या नजरेने हे अनेकदा पाहिलंय. आश्रमात निवासाला असलेल्या एका साधकाने गुरूदेव वापरत असलेली खाट अंगणात आणून ठेवली तेव्हा त्या खाटेमध्ये ढेकूण भरलेले होते. तात्काळ त्यांच्या अंत:करणातील गुरु भक्ती उफाळून आली. खाट स्वच्छ करून ढेकूण नष्ट करावेत आणि गुरूदेवांना निर्विघ्न झोप लागावी या सदहेतूने त्याने एक पुसणी तयार केली आणि केरोसीनमध्ये बुडवून खाटेच्या छुप्या भागांमध्ये तिला फिरवायला सुरूवात केली. हेतू हा की ढेकूण मरावेत. मात्र ते ढेकूण नशीबवान होते–गुरूदेवांच्या पावन सान्निध्यात रात्र घालवायची संधी त्यांना मिळत असे. तितक्यात तेथे गुरूदेव आले. साधकाचे हिंस्त्र कृत्य बघून त्यांच्या मुखावर वेदना उमटली. ती बघताच साधक थबकला. ''ओजी, थांबवा हे सगळं.'' गुरूदेव म्हणाले.''अहो स्वामीजी ही खाट ढेकणांनी भरलेली आहे. आपल्याला शांतपणे झोप येत नसेल.'' काही हरकत नाही. ही खाट काही दिवस जंगलात नेऊन ठेवा आणि दरम्यान मला दुसरी खाट द्या.'' गुरूदेवांनी त्वरीत उत्तर दिले.(क्रमश:)

- Sivananda's Integral Yoga
by Swami Venkatesananda

---

Before you perform any action, scrutinize your motive. If there is selfishness, give up that action. It takes some time to purify the motives. Go on doing actions incessantly and watch your motives. Gradually the motives will become purer and purer.

**- Swami Sivananda**

You may have the fullest grace of God and the blessings of the saints but unless you make up your mind to do sincere Sadhana, divine grace will be of no avail.